# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 150 / 2023 दिनांक : 13.04.2023

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती / मिरवणुक संबंधाने नांदेड शहरा मध्ये नांदेड पोलीसांचे पथसंचलन

नांदेड जिल्हा पोलीसदला तर्फे **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती / मिरवणुक** संबंधाने नांदेड शहरा मध्ये **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक 13.04.2023 रोजी पथसंचलन घेण्यात आले.

सदरचे पथसंचलन **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा**, रेल्वेस्टेशन येथून सुरवात होवून शिवाजीपुतळा, वजिराबाद चौक, कलामंदीर, शिवाजीनगर, फुले मार्केट, आय.टी.आय. चौक, श्रीनगर, वर्कशॉप कॉर्नर येथे पथसंचलनाचा समारोप करण्यात आला. सदर पथसंचलानमध्ये **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री चंद्रसेन देशमुख**, उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग, नांदेड शहर, **मा. डॉ. श्री सिध्देश्वर भोरे**, पोलीस उप अधिक्षक, इतवारा विभाग, तसेच नांदेड शहरातील सर्व प्रभारी अधिकारी, **श्री जगदीश भंडरवार**, पोस्टे वजिराबाद, **श्री मोहन भोसले**, पोस्टे शिवाजीनगर, **श्री सुर्यमोहन बोलमवाड**, पोस्टे भाग्यनगर, **श्री साहेबराव नरवाडे**, पोस्टे विमानतळ, **श्री अशोक घोरबांड**, पोस्टे नांदेड ग्रामीण, **श्री प्रशांत देशपांडे**, जिवीशा यांनी व त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकरी व अंमलदार, होमगार्ड, आर.सी.पी., राज्य राखीव पोलीस बल, यांनी सदर पंथसंचलन मध्ये भाग घेतला.

मिरवणुकी मध्ये भाग घेणारे नागरिकांनी पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून आनंद साजरा करावा कोणीही वाहनावर मर्यादेपेक्षा जास्त व्यक्ती बसवून फिरवू नये तसेच ट्रीपल सीट, वाहनाचे सायलन्सर काढुन कर्कश आवाज करून वाहन चालवूनये किंवा ठरवून दिलेल्या मिरवणुक मार्गाशिवाय इतरत्र मिरवणुक काढू नये, शांततेत सन उत्सव / जयंती / मिरवणुक साजरी करावी, नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात येईल. असे **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी जनतेस आव्हान केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


AXIS BANK




AXIS BANK